**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अंधेरी, मुंबई यांच्या न्यायालयात (न्यायालय क्र.६६)**

**जामीन अर्ज क्र. २१०४/२०२५**

**गुन्हा रजि.क्र.९२७/२०२४**

**आदेश**

१. आरोपी अरशद अफजल हुसैन खान यांनी प्रस्तुतचा अर्ज जामीन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदरील अर्जाला अनुसरुन सरकारी वकील व तपासी अंमलदार यांनी त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केले. त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

२. सदरहू अर्जाला अनूषंगून मुळ केसचे अवलोकन केले. आरोपी यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ७८, ७९ सह कलम ६७, ६७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत केसमधील मुळ फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये प्रेमसंबध होते व त्या प्रेमसंबधामधुन सदरची फिर्याद दाखल करण्यात आलेली आहे असे मुळ तक्रारीचे स्वरूप आहे. निश्चितच आरोपी विरुध्दच्या गुन्हयाचे स्वरुप गंभीर आहे. परंतु फिर्यादी व आरोपी यांच्यामधील पुर्वसंबधाचा विचार करता, आरोपीचा जामिन अर्ज फेटाळणे संयुक्तिक होणार नाही. प्रस्तुत केसमधील आरोपी हा दि. ०४/१२/२०२५ पासुन कोठडीमध्ये आहे. त्यामुळे काही कडक अटी व शर्तीवर आरोपीची जामिनावर मुक्तता करणे आवश्यक ठरते.

**सबब आदेश खालिलप्रमाणे—**

१. आरोपी अरशद अफजल हुसैन खान याची रूपये २५,०००/— (पंचवीस हजार रुपये) च्या वैयक्तीक जातमुचलका व पंचवीस हजार रुपयांचा सॉल्व्हन्सी सर्टीफिकेट असणा—या जामिनदाराद्वारे जामिनावर मुक्तता करण्यात यावी.

२. आरोपी याला सॉल्व्हन्सी सर्टीफिकेट असणारा जामिनदार देता येणे शक्य नसेल तर आरोपी याने रूपये २५,०००/— (पंचवीस हजार रुपये) चा वैयक्तीक जातमुचलका व पंचवीस हजार रुपयाचा रोख जामिन सादर करावा व तो जामिन दिल्या नंतर आरोपीची जामिनावर मुक्ताता करण्यात यावी.

३. आरोपी व जामिनदार यांनी त्यांच्या कायम रहिवासाचा पत्ता दर्शवणारे पुरावे म्हणजेच आधार कार्ड अगर लाईट बिल इत्यादी कागदपत्र जामिनाची पुर्तता करते वेळीस जामिनपत्रासोबत दाखल करावेत.

४. आरोपी याने दोषारोपत्र दाखल करेपर्यंत दर गुरूवारी सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत साकीनाका पोलीस स्टेशन येथे हजर राहुन पोलीसांना तपासकामात सहकार्य करावे.

५. जामिनदार यांनी ते आरोपींना नियमित केस कामी हजर ठेवतील असे स्वतंत्र अंडरटेकींग जामिनपत्रासोबत सादर करावे.

६. आरोपीने साक्षीदारांवर दबाव टाकू नये असे आरोपीला निर्देशित करण्यात येत आहे.

Sd/-

दिनांक : १५/१२/२०२५

(अ. अ. मेहेंदळे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
६६वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.